वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे कार्यालय

पहा : मा. जिल्हा न्यायालय, वाशिम यांची कार्यालयीन टिप्पणी दिनांक ०६/०८/२०२६.

विषय :- 'यु.पी.एस दुरुस्तीकरीता दरपत्रक मागविण्याबाबत.

संगणक विभाग जिल्हा न्यायालय, वाशिम येथील **Power + with 06 Nos Battery या यु.पी. एस** मध्ये डिस्प्ले दाखवत नसल्यामुळे सदर यु.पी.एस नादुरुस्त झाले आहे. त्याअनुषंगाने यु.पी.एस दुरुस्तीसाठी स्थानिक बाजापेठेतुन खालील अटी व शर्तींवर दरपत्रके दिनांक ०४/०८/२०२६ पर्यंत मागविण्यात आली होती, परंतु एकही दरपत्रक या कार्यालयाला प्राप्त झाले नाहीत. करीता खालील अटी व शर्तींवर दरपत्रके पुन्हा मागविण्यात येत आहेत.

१. यु.पी.एस. दुरुस्ती, आदेश दिल्यापासून १० (दहा) दिवसाचे आत करणे बंधनकारक राहील.

२. यु.पी.एस. दुरुस्तीसाठी जिल्हा न्यायालय, वाशिम येथे प्रत्यक्षात येवून दुरूस्ती करणे बंधनकारक राहील.

३. यु.पी.एस. दुरुस्ती केल्यानंतर एक वर्षाच्या आत संबंधीत पार्ट मध्ये काही तांत्रीक बिघाड झाल्यास सदर पार्ट तात्काळ बदलवून देणे अनिवार्य राहील.

४. यु.पी.एस. दुरुस्तीबाबतच्या देयकाचे प्रदान हे अदाता नोंदणी पदध्तीद्वारे सरळ अदात्याचे बॅक खात्यात जमा करण्यात येईल.

दरपत्रक धारकाला दरपत्रक सादर करण्यापुर्वी संगणक विभाग जिल्हा न्यायालय, वाशिम येथे कार्यालयीन वेळेत यु.पी.एस. तपासणीकरीता येण्याची मुभा राहील. दरपत्रक धारकाने यु.पी. एस दुरुस्ती करीता आपले दरपत्रक सर्व कर, किंमती व अटीसह **दिनांक २०/०८/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम** यांचे नांवे या कार्यालयास बंद लिफाफयामध्ये सादर करावे. तसेच बंद लिफाफयावर **'यु.पी.एस. दुरूस्ती'** असे ठळक अक्षरात नमुद करावे.

तसेच प्राप्त झालेले दरपत्रक कोणतेही कारण न दाखविता नामंजूर करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांना राहील.

आदेशावरून,

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, वाशिम

दिनांक : ०६/०८/२०२६